# जिल्हा परिषद,धाराशिव

शिक्षण विभाग (प्राथमिक)

जा.क्र.जिपउ/शिक्षण/आस्था-7/९३१ /2024 दि.27/06/2024

# प्रसिध्दीपत्रक

**विषय:- शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-2022 मुलाखतीशिवाय पद निवडीचा विकल्प दिलेल्या संस्थामध्ये पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक भरती निवड यादीतील उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणीबाबत...**

**संदर्भ:-** १) मा.शिक्षण आयुक्त,महा.रा.पुणे यांचे पत्र दि.२५/०२/२०२४

२) मा.शिक्षण आयुक्त,महा.रा.यांचे पत्र दि.२५/०६/२०२४

३) पवित्र संगणक प्रणालीमार्फत दि.२५/०६/२०२४ रोजी प्राप्त गुणवत्ता यादी

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार पवित्र संगणक प्रणालीमार्फत जिल्हा परिषद धाराशिव करिता शिक्षण सेवक पदावरील निवडीसाठी शिफारसपात्र एकूण २७ उमेदवारांची गुणवत्ता यादी दि.२५/०६/२०२४ रोजी प्राप्त झालेली आहे.

सदर यादीमध्ये नमूद सर्व उमेदवारांनी आपले कागदपत्र पडताळणीसाठी **कै.यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद धाराशिव येथे बुधवार दि.०३/०७/२०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता व्यक्तिश: उपस्थित रहावे.** कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित रहात असताना उमेदवाराने या सोबत जोडलेल्या सूचीप्रमाणे अनुक्रमे सर्व कागदपत्र व स्वसाक्षांकन केलेल्या छायांकित प्रतीसह उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

उपरोक्त विहित वेळापत्रकानुसार संबंधित उमेदवार कागदपत्र पडताळणी कामी उपस्थित न राहिल्यास त्यांची अनुपस्थिती राज्यस्तरावर कळविण्यात येईल. तसेच अनुपस्थितीबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील याची नोंद घ्यावी.

सोबत:- १) निवड यादी

२) पडताळणी सूची

३) हमीपत्र

**(अशोक पाटील)**
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद धाराशिव

**प्रत माहितीस्तव :-**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव

Scanned with OKEN Scanner